## श्रीसाइनाथ

### अभंग

आहों तैसे राहूं आम्हीं सर्व काळीं ॥ तो साई सांभाळी आम्हांप्रती ॥१॥
नाहीं दुसऱ्याचें आम्हां कांहीं काम ॥ साईनें निष्काम केलें आम्हां ॥२॥
निष्काम होऊनि साधूं आत्मतुष्टि ॥ भुक्ति मुक्ति मुष्टीं आम्हां मग ॥ ३ ॥
आमुची मुमुक्षा पूर्ण करी साई ॥ इतर तो देई काय आम्हां ॥ ४ ॥
राजे आणि रंक आम्हां सर्व सम ॥ लौकिकी तो काम नाहीं आम्हां ॥५॥
लौकिकी संपदा ख्याती सर्व जन ॥ त्यां तृणासमान मानूं आम्हीं ॥ ६ ॥
प्रारब्धें हा देह तो कैसाही राहो ॥ त्याकडे न पाहों आम्हीं आतां ॥७॥
आमुचें तें काम एका साईपाशीं ॥ आम्हीं इतरांसी नव्हों लीन ॥ ८ ॥
साईच्या आधारें मत्त झालों आम्हीं ॥ विषयांची ऊर्मी मावळली ॥ ९ ॥
परोपकाराचा काम तोहि क्षीण ॥ साई इच्छेवीण घडेना तो ॥ १० ॥
त्यामाजी अहंता ती आम्हांसि नाहीं ॥ घडवितो साई तेंचि घडे ॥ ११ ॥
माझी सहस्रधी तिला परकर्मी ॥ अथवा अकर्मी योजी साई ॥ १२ ॥
स्थूल सूक्ष्म देहें जीं जीं होतीं कर्में ॥ तीं सारीं अकर्में साईकरी ॥ १३ ॥
आम्हांस तो एका साइपायीं आस ॥ तेथें सदा वास आम्ही करूं ॥१४॥
सर्वेश्वर गुरु हा मनीं निर्धार ॥ आम्हां सर्वाधार साईनाथ ॥ १५ ॥
एका साईवरी टाकूं आम्हीं भार ॥ स्वसुखदातार तोचि आम्हां ॥ १६ ॥
साई कृपा करी नीलकंठावरी ॥ तो निज अंतरीं शांत झाला ॥ १७ ॥

## महाराजांचे अनुभव.

एकदा माझे एक स्नेही महाराजांचे दर्शनास आले व तेथे बसल्यावर महाराजांचे पाय दाबू लागले. पाय दाबतां दाबतां महाराज एकदम त्यांना म्हणाले "पाय दाबू नकोस सरकून बैस." त्याप्रमाणे ते गृहस्थ मागें सरकले. थोडया वेळानें त्यांचे डोळे भरून आलेले दिसले. त्यावर थोडा वेळ गेला व मग ते पुनः पाय दाबू लागले. त्या वेळी महाराज कांहीं बोलले नाहीत. नंतर ते स्नेही वाडयांत आले तेव्हां सांगू लागले कीं पहिल्यांदा पाय दाबीत असतां एक अमंगळ विचार माझ्या मनात आला व तत्क्षणीच महाराजांनी मला सरकून बसायाला सांगितले. मग मला त्याबद्दल पश्चात्ताप झाला व मनातल्या मनांत महाराजांची क्षमा मागितली व त्यानंतर पुन्हा पाय दाबू लागलो तो महाराजांनी कांहीं मना केलें नाहीं. अशाच तऱ्हेचे अनुभव महाराजांचे भक्तांना नित्य येत. अर्थात महाराजांची शिक्षण पद्धति अनिर्वचनीय होती.

(१५)

### ॥ श्रीसद्गुरु साईनाथ प्रसन्न ॥

एकदां मी सकाळी नित्यप्रमाणे महाराजांचे दर्शनास गेलो. तेव्हां महाराज धुनीपाशीं उभे होते. मी जाऊन पायां पडतांक्षणीच महाराज म्हणाले "अरे काळजी तुला कसली, सगळी काळजी मला आहे." मी पुन्हा नमस्कार करून म्हटले "खरंच सगळी काळजी आपल्यालाच आहे." महाराजांना आमच्याबद्दल आमच्यापेक्षां कितीतरी पटीनें जास्त काळजी आहे याचे नित्य अनुभव येत असल्यामुळे महाराजांचें बोलणें अक्षरशः पटलें. तरीपण हे शब्द आज महाराजांनी कां उच्चारिले याबद्दल खुलासा होईना. तो खुलासा मी मुंबईस गेल्यावर झाला. ज्या दिवशीं महाराजांनी हे शब्द उच्चारिले त्याच दिवशीं माझी मुलगी [illegible] माझ्या घरीं दिवाणखान्यांत खेळत असतां कोपऱ्यांत असलेल्या कपाटावर चढू लागली. तोंच ते कपाट तिच्या अंगावर आलें. ती खाली पडली व कपाट तिच्यावर पडलें. कपाटावर काचेची व धातूची खेळणीं होतीं पण

सर्वस्वी काळजी वाहणाऱ्या मालकाची अशी कांहीं कृपा कीं, तीं सर्व खे
जणूंकाय उचलून बाजूला ठेविल्यासारखीं आणि मुलीला यत्किंचि
इजा झाली नाहीं. नाहीं म्हणावयाला तिची एक बांगडी पिचली व ि
हात त्यामुळें थोडासा खरचटला.

असेंच एकदां तीच मुलगी रात्रीं शौचकूपांत गेली तों तेथें एक
सर्प होता, मुलीचें वय तेव्हां पांच वर्षांचें होतें. साप तिनें पहाए
पूर्वी तिच्या बरोबरच्या गड्यानें पाहिला व त्यानें तिला ताबडतोब
लून बाहेर नेली.

( १६ )

डहाणूचे उद्धवेशबुवा कांहीं मंडळी घेऊन एकदां द्वारकेस या
गेले होते. मुंबईहूनच आगबोटीनें गेले. सर्व मंडळीची टिकीटें बु
जवळ होतीं. टिकिटांचे दोन भाग असतात, एक बोटीच्या टिकिटा
दुसरा मचव्याचे टिकिटाचा. बुवांनीं मचव्याचीं टिकिटें वेगळीं फाडून
खिशांत ठेविलीं व बोटीचीं टिकीटें आपल्या पैशांच्या पाकिटांत ठे
आगबोटीवर असतांना तें पैशांचे पाकिट त्यांना कांहीं कारणास्तव
काढावें लागलें. त्यावेळीं ते कठड्यापाशीं उभे होते. पाकीट काढतां क
तें समुद्रांत जाऊन पडलें अर्थात बोटीची सर्व टिकिटें व बुवांचे पैसे
समुद्रास्तृप्यंतु झाले. बोटींतून उतरतांना टिकिटें द्यावीं लागतात बु
टिकिट कलेक्टरास वरील मजकूर सांगितला व टिकिटें घेतली होत
गोष्टीचे प्रत्ययासाठीं मचव्याचीं टिकिटें दाखविलीं; तितक्यानें टि
कलेक्टराची समजूत झाली व त्यानें कोणत्याही तऱ्हेनें अडविलें न
द्वारकेस उतरल्यावर गोमती स्नानाला, देवाच्या चरण स्पर्शाला, पू
कर द्यावा लागतो. बुवांजवळ अर्थात पैसे उरले नव्हते व महारा
अढळ श्रद्धा असल्यामुळें " तुजवांचुनि इतरांते दिन मुख पसरोनि
मागावें" या पंतोक्तिप्रमाणें कोणाजवळ न मागतां शिर्डीस महाराजां
लिहिलें ज्या दिवशीं द्वारकेस बुवांनीं पत्र लिहून टाकिलें त्याच
महाराज डहाणूच्या एका धनिक भक्ताच्या स्वप्नांत गेले व त्याला प
समुद्रांत पडल्याची हकीगत सांगून बुवांस ताबडतोब पैसे पाठविण

आज्ञा केली. त्या भक्तानें दुसरेच दिवशीं इन्सुअर करून पन्नास रुपये बुवांस पाठविलें व स्वप्नाचा मजकूर लिहिला.

( १७ )

शंकरराव क्षीरसागर मामलतदार हे एकदां महाराजांचे दर्शनास आले असतां महाराजांनीं दक्षिणा मागितली. त्यांनीं खिशांत असलेले सर्व पैसे महाराजांचे हातांत दिले. वाड्यांत आल्यावर त्यांना कोणी विचारिलें कीं 'तुम्हांला परत जाण्यास पैसे कोठें आहेत, शंकरराव म्हणाले बाबा देतील. त्याच दिवशीं संध्याकाळीं राहत्याचे पोष्टमास्तर आपल्या एका पाहुण्याला घेऊन तेथें आले. त्या पाहुण्याला शंकररावांनीं वीस रुपये कांहीं वर्षांपूर्वी उसनें दिले होते, तें त्यानें त्या दिवशीं न मागतां शंकररावांना परत दिले.अर्थात शंकररावांची सर्व बेगमी तेवढ्यानें झाली.

( १८ )

महाराजांनीं देह मंगळवार ता. १५ अक्टोबर १९१८ रोजीं तिसरे प्रहरीं ठेविला. त्याच दिवशीं रात्रीं ते येथील लक्ष्मण भटाच्या स्वप्नांत गेले आणि म्हणाले बापुसाहेब जोग माझी काकडआरती करावयाला येणार नाहीं, कारण त्याला वाटतें कीं मी मेलों. मी जिवंतच आहें. तूं येऊन माझी काकडआरती कर. स्वप्नांत आज्ञा झाल्याप्रमाणें पहांटेस लक्ष्मणभट मशिदिंत गेले कारण बाबांचा देह ते दिवशीं मशिदींतच ठेविलेला होता व त्यानें जाऊन तेथें आरती केली. त्यावेळीं बाबांचा हात हालत होता असा कित्येकांना भास झाला. दोनप्रहरीं आरती नित्याप्रमाणें मशिदींत झाली व संध्याकाळीं म्हणजे ता.१६ रोजीं बाबांचा देह बापूसाहेब बुट्टींचे वाड्यांत आणून ठेविला आणि तेथें त्या रात्रीं शेजारती झाली आणि तेथें नित्याप्रमाणें काकडआरती, दोन प्रहरची आरती, संध्याकाळची आरती व शेजारती हा क्रम सुरु झाला तो अद्याप चालला आहे.

( १९ )

महाराज समाधिस्त झाल्यावर दोन तीन दिवसांनीं सांटाक्रूझच्या मोरेश्वरराव प्रधानांच्या मेहुणीचे स्वप्नांत गेले व म्हणाले, तुझ्या ट्रंकांमध्यें पिवळा

पितांबर आहे तो माझ्या समाधीवर घालण्यासाठीं पाठवून दे. त्या बाईनें तो पितांबर पुष्कळ वर्षांपूर्वी बाजूस ठेवून दिला होता व तिला त्याचें स्मरणही नव्हतें. सकाळीं उठल्यावर बाईनें आपलें स्वप्न मोरेश्वररावास सांगितलें व तावडतोब ट्रंकामधून पितांबर काढून शिर्डीस पाठविण्यासाठीं त्यांचें स्वाधीन केला. तो हल्लीं येथें आहे व मधून मधून महाराजांचें समाधीवर घातला जातो.

(२०)

एके दिवशीं पहाटेस लक्ष्मणराव उर्फ काका महाजनी यांचे स्वप्नांत महाराज गेले व म्हणाले " निजलास काय. उठ माझा आज तिसावा दिवस आहे तो कर " महाजनी जागे झाले व त्यांना वाटलें कीं, तिसावा दिवस तर केव्हांच होऊन गेला असेल, तरीं पण त्यांनीं दिवस मोजले व त्यांना असें आढळून आलें कीं तोच तिसावा दिवस आहे. त्यांनीं ब्राह्मणाला बोलावून महाराजांच्या पादुकांना अभिषेक करविला आणि कांहीं भक्तमंडळीस जेवावयास बोलावून महाराजांची प्रथम मासिक पुण्यतिथि साजरी केली. त्यानंतर प्रत्येक मासिक पुण्यतिथि मुंबईस साजरी करण्यांत आली.

(२१)

## श्रीसाईबाबांच्या कांहीं लीलाबद्दल

रा. रा. गणेश गोविंद नरके यांचे रा. रा. हरी सीताराम दिक्षित यांस आलेल्या ता० ४।३।१९१८ चे पत्रांतील उतारा:—

परवाचे दिवशीं (ता. २ मार्च १९१८) नाथषष्ठी (श्री एकनाथ महाराजांची पुण्यतिथी) झाली. दुपारीं बहुतेक मंडळींना बाबांनीं आजीबाईच्या पुराणास पाठविलें, तेथें बाईनीं रसाळ वाणीनें नाथांचे चरित्र सांगितलें तिकडे न्याहारीनंतर बाबांनीं कांहीं गोष्टी सांगितल्या त्यांत नामदेव व कबीर यांचा उल्लेख होता. सायंकाळीं भाकरीचे वेळीं बाबा तात्याशीं भांडले; भाकरीचें ताट फेंकून दिलें व सावण्या भरविणें, फळें वगैरे होण्यापूर्वीच समर्थांनीं नारसिंहाचा अवतार घेतला. वाड्या-

तून फकीरबाबा, डॅाक्टर वगैरे मंडळी स्वरूप पहावयास देवळांत गेली होती; दादांला-म्हणाले " ह्याला ( तात्याला ) हाकून दे नाहीतर मीच खालीं जातों " आवेशांतच चौरंगाजवळ जाऊन तात्याला मारावयाला धोंडे घेतले व बरेच संतापले तात्या खालीं आला; परंतु त्यानें "फळें खाऊं घातल्याशिवाय चावडींत जाऊं देणार नाहीं. " असा हट्ट घेतला. संध्याकाळीं ८-४५ ला घंटा झाली व सर्व मंडळी जमली, भजन सुरू झालें पण तात्या रुसला. बाबांनीं दादाकडून तात्याला बोलावूं पाठविलें. पण तात्या हट्ट सोडीना व बाबा फळें खाण्याचें कबूल करीनात. ९-३० झाले, १०-३० झाले, मंडप स्त्री पुरुषांनीं गच्च भरला, पालखी तयार करून ठेवली. घोडा फाटकाजवळ उभा राहिला व भजनाचा कडाका उडून राहिला. बाबा गादीजवळून उठून चौरंगाजवळ आले व नंतर खांबाजवळ जाऊन बसले. बाबा शांत होते व कांहींच बोलत नव्हते. जिल्हे पैठणांत पालखी निघेपर्यंत बाबा उशीर करणार असें जो तो बोलूं लागला व जणूं काय पैठणांतच आहोत असें समजून मंडळी कडाक्यानेंच नाचून भजन करूं लागली. ११ वाजले व दादांनीं घरीं जाण्याची परवानगी मागितली. बाबा म्हणाले "कुठे जातोस बैस" ह्यानंतर बाबा, त्रिमारींत एकदा दरबार केला होता तसाच करितात कीं, काय असें वाटूं लागलें. फरक हा कीं, त्या दिवशीं अतिशय शांतता होती व ह्या दिवशीं मंडपांत भजनाचा कडाका उडून जिकडे तिकडे आनंदी आनंद होऊन राहिला होता. दोन्हीही चावडीचे दिवस होते. शेवटीं तात्यानीं आपला हट्ट सोडला. तात्यानीं हट्ट सोडल्यावर बाबा हट्ट धरून बसले " नाहीं जायचं " असें म्हणत, दादाला म्हणाले " वरं बा फार रात्र झाली जा आतां" भजनाला व भटे लोकांनां शिव्या देऊन भजन बंद करविलें. म्हाळसापतीला म्हणाले "चल आपण तक्यांत जाऊं " तात्या वर गेला त्याला सर्व मंडळीस हांकून देण्यास सांगितलें. कांहीं वेळानें तात्यालाही जावयास सांगितलें. सर्व मंडळी घरोघर गेली. बापूसाहेबही गेले, समर्थ ( आम्ही नी, खडके वगैरे शिर्डीतच होतों ) गादीवर बसून पुन्हां संतापले, व शिव्या देऊं लागले कितेकांचा उच्चार झाला त्यांत आपलेंही नांव होतें. शेवटीं दोन प्रहर रात्रीस ( बाराचे सुमारास ) " चला " असें म्हणाले गाडीवाडेनें घंटा पुन्हां

[..]विली. तात्या व बापूसाहेब आले व वहिवाटीप्रमाणें चावडी फार [..]दानें झाली. नाथ षष्टीचीच ही लीला होय, असें सर्वांना वाटत होतें. [..] दिवशीं सकाळीं बैठकीचे वेळीं ह्याच्याच गोष्टी होत्या. त्या वेळीं [..] बऱ्याच लांबल्या. उठावयास १०-३० वाजले. भिंतीजवळ तात्या [..]; तात्या म्हणाला " काय बाबा आम्हाला नीट सांगितलं असतं [..] दोन प्रहर रात्रींपर्यंत भजन करा म्हणजे जाऊं, तर कां आम्हीं ऐकलं [..]तं. " " लई खेलाडू. " बाबा म्हणाले " तुम्हीच. तुम्ही अन् बापु-[..]हेब हरदम खेले आहांत " लेंडीवरून परत जातांना लोकांना बाबा-[..]वारीत होते " काल कां उशीर झाला होता ? " असो इथें फार आनंद [..]हे.

( २२ )

रा. रा. मोरेश्वरराव प्रधानांचा मोठा मुलगा एकदां बराच आजारी [..]ता. त्या वेळीं त्यांच्या एथें एक तेलंगी शास्त्रीबुवा राहत असत. ते [..]स्त्रीबुवा श्री दत्तउपासक होते. त्यांना मोरेश्वरराव श्री सांई महारा-[..]ंचे भजनीं लागले हें पसंत नव्हतें. ते म्हणाले तुम्ही बाबानां सोडा [..] श्री दत्ताला शरण जा म्हणजे तुमचा मुलगा बरा होईल. प्रधान म्हणाले [..]ाबा हे दत्तच आहेत. शास्त्रीबुवा म्हणाले जर हा मुलगा पांच मिनिटांत दूध पिऊं लागेल तर बाबा दत्त आहेत असें मी मानीन. व उद्यां पासून मुलाला आराम वाटू लागून लौकरच बरा होईल तर मी बाबांचे दर्शनास जाईन व सवाशें रुपये दक्षिणा देईन त्या प्रमाणें पांच मिनिटांतच मुलगा दूध पिऊं लागला व दुसरे दिवसापासून त्याला आराम पडूं लागला. मुलगा साफ बरा झाल्यावर शास्त्रीबुवा शिर्डीस महाराजांचे दर्शनास गेले सवाशें रुपये दक्षिणा दिली. नंतर तिसरे प्रहरीं महाराजांनीं पांच रुपये दक्षिणा मागितली. तेव्हां माधवराव देशपांडे महाराजांस म्हणाले "सकाळीं यांनीं सवाशें रुपये दिले आतां आणखी पांच रुपये कशाला ?" महाराज म्हणाले "सवाशें रुपये दिले ते त्यानें आपल्या दत्ताला दिले. ते मला कोठें दिले !" शास्त्रीबुवांनीं मागितल्याप्रमाणें पांच रुपये दिले.

मनास आल्यास श्रीसाईबाबा आपल्या सभोंवार बसलेल्या भक्तवृन्दास मोठ्या आनंदानें अनेक गोष्टी सांगत त्यांतील कांहीं खालीं दिल्या आहेत.

त्या पुढीलप्रमाणें.

(२३)

एका माळ्याकुणब्याचा मुलगा होता. तो वाड्यांत आला. तेथेंच तो वाढला. बारा वर्षे राहिल्यानंतर रडूं लागला. घरीं आईबापांकडे जाण्यासाठीं रडूं लागला. त्याला बादशहानें सांगितलें, आपल्या आवारांत पुष्कळ वाडे आहेत. त्यांतल्याच एखाद्या वाड्यांत रहा असें त्याला सांगितलें. वाडा त्याला दिला. तो पुन: रडूं लागला. मग बादशहानें आपल्या मुलीशीं त्याचें लग्न लावून दिलें या मुलीला पोर झालें नाहीं, म्हणून त्यानें माळ्याकुणब्याची मुलगी तिच्याशींही लग्न लावलें. तरी फिरून रडूं लागला. बादशहानें पुष्कळ समजाविलें तरी तो गेला. मग बादशहानें त्याला कांहीं द्रव्य दिलें कारण बादशाह मोठाच माणूस होता. त्याचें नांव राहिलें आहे.

तात्पर्य–बादशहा इतका जीव देत होता. वाडा दिला. आपली मुलगी दिली तरी आईबापाकडे जाण्याची म्हणजे संसारांत पडण्याची ओढ गेली नाहीं. बादशाहा मोठा माणूस होता म्हणून त्याला कांहीं द्रव्य दिलें. पण जर बादशहाचें ऐकलें असतें आणि राहिला असता तर राज्य मिळालें असतें.

(२४)

–चार भाऊ होते. त्यापैकीं दोघे एका गांवाला गेले. ते माळी कुणबी होते तेथें एक जाणती मुलगी होती. ती कबिराची होती. तेथें त्यांनीं कांहीं सगगें घेतलीं. नंतर त्या मुलीला खुणावलें. ती गेली. तिला घेऊन ते आपल्या गांवीं गेले. मी लहान होतों. मीही संगें गेलों. गांवीं गेल्यावर लोकांनीं चौकशी केली व भय वाटलें. मग ते दोघे त्या मुलीला घेऊन एका डोंगरांत गेले. मीही मागोमाग गेलों. त्या मुलीला दोन बच्चे झाले पुढें तिच्या आईबापाला शोध लागला. कांहीं मंडळी म्हणाली पोरीला

घेऊन चला व या लोकांना मारून टाका. आईबाप म्हणाले पोरीला बच्चे झालें आहेत. आतां राहूं द्या.

( २५ )

एक वाणी होता. त्यानें तुपाचीं तीन भांडीं भरलीं. माझा म्हतारा जवळ होता तो म्हणाला माझ्यापुढें भांडी ठेवशील तर मी सगळें तूप एकटा खाईन. तितक्यांत वाण्याचा भाऊ त्याला ~~जेवायास बोलावयाला~~ आला वाण्यानें तुपाची भांडी आंत दुकानांत ठेऊन कुलुप लावलें. माझ्या म्हाताऱ्याला वाणी म्हणाला मी जेऊन आलों म्हणजे तुम्हाला फुटाणे देईन. मी म्हाताऱ्याजवळच होतों. दुसरी दोन पोरें होतीं त्यांनी मागची भित पडकी होती. तिला एक लाथ मारली तों भित पडली व सगळें मोकाट झालें. मग त्या दोन पोरांनीं दोन भांडयांतलें तूप पार केलें म्हाताऱ्यानें मला इशारा केला मग मी तिसऱ्या भांडयांतलें तूप पार केलें. दुकानदार परत आला त्याला मी तुपाचें सांगितलें. दुकानदार पाहतो तों कांहीं सोनें वगैरेही नाहीसें झालें. मग आम्हाला सगळ्यांना चावडीवर नेलें. खरा चोर सांपडला आम्हाला सोडून दिलें: मग आम्हांला हगवण लागली तों सगळें तूपच हगूं लागलों मग माझ्या म्हाताऱ्यानें मला नीट केलें. त्या वाण्यानें पुढें मला दोन वर्षें जेऊं घातलें.

## श्रीसद्गुरु साईनाथ प्रसन्न.

शके १८४५ व इसवी सन १९२३ च्या रामनवमीच्या उत्सवा-द्दल दास गणू महाराज यांनीं श्री चरणीं सादर केलेलें पत्रः—

श्री सच्चिदानंद सद्गुरु आधुनिक संतचुडामणी भक्तकाम कल्पद्रुम श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांच्या पवित्र चरणारविंदीं श्रीराम नव-मीच्या जमाखर्चाची व उत्सवाची हकीगत सादर करितों तीः—

(१) या उत्सवास अष्टमीपासून आरंभ होऊन द्वादशीस काला केला. उत्सवाची समाप्ती झाली. कांहीं पुर्तता होणें राहिली होती ती पोर्णिमेस केली. असा एकंदर ६ दिवस उत्सव झाला.

(२) या उत्सवास पाहुणे मंडळी आली तीः—

श्रीमंत आण्णासाहेब बोराळकर, रावसाहेब माझोडकर, श्रीमंत आप्पासाहेब नानोळकर, जनार्दन अण्णा, गोविंद व्यंकटी महाजन, बाबा रामचंद्र पत्तेवार व त्यांचे गुमास्ते मंडळी, नागोबा, पापा लाला, नारायण, व्यंकोबा, बाबा श्रीमंत सरकार बुळे साहेब मंडळीसह व राणी साहेबांसह, नानासाहेब पाडकीकर, जिवन लाल गंगाराम शेटजी, भगवा-नराव मानरमकर, रामचंद्रराव वकील-वरुडकर, दादासाहेब वरुडकर, अशी मंडळी समक्ष हजर राहिली.

(३) अडचणीमुळें समक्ष न येतां आश्रयामुळें ज्यांनीं उत्सवांत भाग घेतला ती मंडळी-धोंडोपंत वकील, बळवंतराव खेडकर, शंकरराव-मुळावेकर,

(४) आतां उत्सवास मुंबईकडील मंडळी आली तीः—

रावसाहेब दाभोळकर, काकासाहेब दीक्षित, रावसाहेब तर्खड, पुर्णचंद्रभय्या, बुटी, आपल्या मंडळीसह पुरंदरे, पुण्याचे दुकानदार रा. शिंदे, माळी, आंधेरीकर वैद्य, मास्तर, सुंदरराव नवलकर–

(५) आतां उत्सवास सहानुभूती दर्शविलेली मंडळी. बाळासाहेब रेगे, नारायण जनार्दन तेंडुलकर, काकासाहेब महाजनी, जनाबाई

कोठारी, मनमोहन रंगनाथ जयकर, वसंतराव, काका पाटील, श्रीकृष्ण पुरषोत्तम. भवानराव बनसोडे.

(६) आतां ह्या उत्सवास खर्च झाला त्याचा तपशील:—

| जमा रु. | | खर्च रु. | |
|---|---|---|---|
| ७२-[illegible]-० | आपला चरणरज | २१० | रामचंद्र आनंदरुप मारवाडी |
| | दासगणू २५ रु. रोख | | साखर कणिक रवा तांदुळ डाळ |
| | जरीचा रुमाल २७ रु. | | वगैरे सामान पावती बरहु० |
| | ४ उपरणीं २० रु. | ४०-०-० | पंढरपुरकर आचारी |
| ७[illegible]-०-० | राजेसाहेब माझोडकर | ११५-०-० | दारुवाला शेखअहमद |
| ५[illegible]-०-० | गोविंद व्यंकटी महाजन. आकोलकर | | पावती बरहु० |
| ५[illegible]-०-० | बाझा रामचंद्र पत्तेवार | २२-०-० | कासम फकिर बाजेवाला |
| १५-०-० | धोंडोपंत वकील. | ११-०-० | विठोबा सुतार सर्पणा व० |
| १-०-० | शंकरराव मुळावेकर. | ५-४-६ | तेली तुकाराम |
| १-०-० | बळवंतराव खेडकर- | १०-०-० | यमाजी जगताप दुधाबद्दल |
| ५-०-० | आंबेरीकर वैद्य. | ६-०-० | भाजी |
| ५-०-० | आंबेरीकर मास्तर. | १०-०-० | रामनवमीच्या |
| १०-०-० | बापुभय्या कोठारी. | | अभिषेकाची दक्षिणा |
| ५१-०- | बुळेसाहेब | ५-०-० | आंधळे आणि पांगळे |
| ५-०-० | सुंदरराव नवलकर | | यांचीदक्षिणा. |
| ५-०-० | काकासाहेब दिक्षितांची बहीण | २७-१४-० | श्रीचा समाधी खर्च |
| | | | पावती बरहु० |
| १५-०-० | चौबळ | ५-०-० | भोजन दक्षिणा खर्च |
| ५-०-० | सीताबाई रामचंद्र सामंत. | १-८-० | म्हाळसाकांताचा फराळ |
| १-०-० | यशवंतराव अर्नाळेकर | ५-०-० | नाना चोपदार उपरणे पान |
| १०-०-० | बाबा सामंत. | ११-०-० | बाळा शिंपी ,, ,, [ १ रु.५ |
| ५-०-० | चितू शेठ | ७-०-० | लक्ष्मण भट उपरणे पान १ |
| | | | रु. ७ |
| १००-०० | पापालाल. | २७-०-० | बाबा धर्माधिकारी रामा- |

२०-०-० नागोबा वंजारी — यणाचे पारायणाची
१ तुपाचा डबा रु.३० पा.द.रु.१० जरीचा रुमाल रु. २७
२०-०-० त्र्यंकोबा वंजारी — तुपाचा डबा.
४०-०-० लक्ष्मीबाई जोगळेकर तांदुळाचें पोतें
२-०-० दादा साहेब मरूडकर. उपरणे जोडी १ची किंमत.
२-०-० रामराव बरूडकर ,,
५-०-० गांधी १ गुळाची ढेप
८-०-० नारायण वंजारी उपरणे जोडी १
४-८-० बाबारंगारी पत्रावळी १। हजार द. ३ रु. प्रमाणें
५-०-० पापालालची सासू.
४-४-० दत्तोपंत इंगोलीकर.
५०-०-० हनुमंत जयंतीप्रीत्यर्थ. उपरणे जोडया ५ एकंदर किं ५०

६७५-१२-० एकूण जमा.
९७-१०-० खूट आली ती भरण्याकरितां
७७३-६-०

२-०-० आच्याऱ्याला बैलगाडी भाडे
२-०-० विडयांची पानें.
८-८-० वासलेट डबे २
२-१२-० चिमण्या. ४
१-८-० घरे सारविण्यास मोलकरीण व गडी यांची मजुरी.
१-०-० भांडी घासणारीण कोळीण
२-०-० कुंभार आनाजी घागरी रांजण माखे परळ मिळून
६-०-० नानु चहावाले संगमनेरकर उपरण्याचे पान १
६-०-० सुरुदिन धोडेवाला उपरण्याचे पान १
६-०-० अबदुल उपरण्याचें पान १
५-०-० मार्तंड भगत ,,
४-८-० रंग्यागुरव ,,
४-८-० मुरल्या ,,
६-०-० बाळा गुरव ,,
४-०-० महादु फसले ,,
४-८-० सुरदास ,,
४-८-० रगतपीते ३ ,, पाने ३
१-८-० आनंदामास्तर ,, पानें १
१०९-८-० बुंदी प्रयोजन खर्च.

१-०-० हनुमंत जयंति प्रीत्यर्थ अभिषेक खर्च.
१५-०-० आच्यान्याला जरीचा रुमाल बांधला.
१-०-० हरभरे वगैरे यांची डाळ नारळ शेंदूर.
५०-०-० महार मांग भिल्ल चांभार यांना भोजन

७७३-६-० एकूण खर्च.

एणेंप्रमाणें खर्च झाला आहे. यांत पेटीची जमा हगाम्याचा खर्च व तमाशाचा खर्च दाखविला नाहीं. तो तात्या पाटलास माहित आहे.

(७) आतां आपल्या या उत्सवांत ज्यांनीं यथाशक्ति मदत केली त्यांना आपल्या कडोन इहपर लोकाचा उत्तम आशीर्वाद असावा; त्यांचे आपण रक्षण करावें. मोगलाईत नांदेड, मुखेड, उमरी, कुंटूर, कळ वाजुरी, बोपाळे, रामेश्वर, सांगवी, सातेगांव, नायगांव, कोकलेगांव नार्नाळी, अशा गांवीं तुमची मंडळीं आहेत. त्यांचे आपण रक्षण करावें. आपलीं आम्ही पिलें आहोंत. आपल्या सुखदपंखांखालीं आम्हां सर्वदा रक्षण व्हावें. झालेला खर्च चरणीं सादर केला आहे. कळावे सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना; न्यूनाधिकाची क्षमा करावी.

आपला चरणरज,

दासगणू

ह. भ. परायण दासगणूकृत श्रीसाईनाथ स्तवन मंजिरी

श्रीगणेशायनमः । हे सर्वाधारामयूरेश्वरा । सर्वसाक्षी गौरी कुमरा ॥
अचिंत्या लंबोदरा । पाहिमां श्री गणपते ॥ १ ॥
तू सकल गणांचा आदि ईश । म्हणून म्हणती गणेश ॥
तूं संमत सर्व शास्त्रांस । मंगलरूपा भालचंद्रा ॥ २ ॥
हे शारदे वाग्विलासिनी । तूं शब्द सृष्टी स्वामिनी ॥
तुझें अस्तित्व म्हणूनी । व्यवहार चालती जगताचे ॥ ३ ॥
तूं ग्रंथकाराची देवता । तूं भूषण देशाचें सर्वथा ॥
तुझी अवघ्यांत अगाध सत्ता । नमो तुजसीं जगदंबे ॥ ४ ॥
पूर्णब्रह्मा संतप्रिया । हे सगुणरूपा पंढरीराया ॥
कृपार्णवा परम सदया । पांडुरंगा नरहरे ॥ ५ ॥
तूं अवघ्यांचा सूत्रधार । तुझी व्याप्ती जगभर ॥
अवघीं शास्त्रें विचार । करिती तुझ्या स्वरूपाचा ॥ ६ ॥
पुस्तकज्ञानी जे जे कोणी । त्यां तूं न गवससी चक्रपाणी ॥
त्या अवघ्या मूर्खांनीं । शब्दवाद करावा ॥ ७ ॥
तुला जाणती एक संत । बाकीचे होती कुंठित ॥
तुला माझा दंडवत । आदरें हा अष्टांगीं ॥ ८ ॥
हे पंचवक्त्रा शंकरा । हे नरमुंड मालाधरा ॥
नीलकंठा दिगंबरा । ॐमकाररूपा पशुपते ॥ ९ ॥
हें नाम ज्याचे ओठीं । त्याचें दैन्य जाय उठाउठी ॥
ऐसा आहे धूर्जटी । महिमा तुझ्या नांवाचा ॥ १० ॥
तुझ्या चरणा वंदून । मी हें स्तोत्र करितों लेखन ॥
हें सकसावें साद्य पूर्ण । तूं सर्वदा नीलकंठा ॥ ११ ॥

आतां वंदूं अत्रीसुता ॥ इंदिराकुलदैवता ॥
श्री तुकारामादि सकल संतां । तेवीं अवघ्या भाविकांसीं ॥ १२ ॥
जयजयाजी साईनाथा । पतीत पावना कृपावंता ॥
तुझ्या पदीं ठेवितों माथा । आतां अभय असूं दे ॥ १३ ॥
तूं पूर्ण ब्रह्म सौख्य धामा । तूंच विष्णू नरोत्तमा ॥
अर्धांगी ती ज्याची उमा । तो कामारी तूंच कीं ॥ १४ ॥
तूं नरदेह धारी परमेश्वर । तूं ज्ञान नभींचा दिनकर ॥
तूं दयेचा सागर । भवरोगां तूं औषधी ॥ १५ ॥
तूं हीनदीनां चिंतामणी । तूं तव भक्तां स्वर्धुनी ॥
तूं बुडतियांनां भव्य तरणी । तूं भीतासी आश्रय ॥ १६ ॥
जगाचें आद्य कारण । जें कां विमल चैतन्य ॥
ते तुम्हींच अहा दयाघन । विश्व हा विलास तुमचाची ॥ १७ ॥
आपण जन्मरहीत । मृत्युही ना आपणाप्रत ॥
तेच अखेर कळून येत । पूर्ण विचारें शोधितां ॥ १८ ॥
जन्म आणि मरण । हीं दोन्हीही अज्ञानजन्य ॥
आपण दोहोंपासून । अलिप्त मुळींच महाराजा ॥ १९ ॥
पाणी झऱ्यांत प्रगटलें । म्हणून कां तेथ उपजलें ॥
तें पूर्वींच होतें पूर्ण भरलें । आलें मात्र आंतुनी ॥ २० ।
त्याचेंत आलें जीवन । म्हणून लाधलें अभिधान ॥
झरा ऐसें तिज लागून । जलाभावीं त्याचची ॥ २१ ॥
लागला आणि आटला । हें मुळीं न ठावें जला ॥
कांकीं जल त्याचेला । देत नव्हतें महत्व मुळीं ॥ २२ ॥
त्यांचेसीं मात्र अभिमान । जीवनाचा परिपूर्ण ॥
म्हणून तें आटतां दारुण । दैन्यावस्था ये तिशीं ॥ २३ ॥

रदेहही खांच खरी । शुद्ध चैतन्य विमलवारी ॥
खांचा अनंत होती जरी । परी न पालट तोयाचा ॥ २४ ॥
म्हणून अजन्मा आपणा । मी म्हणतसें दयाघना ॥
अज्ञान नगाच्या कंदना करण्या व्हावें वज्र तुम्ही ॥ २५ ॥
ऐशा खांचा आजवर बहूत झाल्या भूमीवर ॥
होती असुन होणार । पुढेंही कालावस्थेनें ॥ २६ ॥
त्या प्रत्येक खांचेमत । निराळें नांवरूप मिळत ॥
तें करून जगतांत । ओळख त्यांची पटतसे ॥ २७ ॥
होतां चैतान्यमत । मी तूं म्हणणें हें ना उचित ॥
कां कीं न जेथें संभवे द्वैत । तेंच चैतन्य निश्चयें ॥ २८ ॥
आणि व्याप्ती चैतन्याची । अवघ्या जगाठाईं साची ॥
मग मी तूं या भावनेची । संगत कैशी लागते ॥ २९ ॥
जल मेघगर्भींचें । एकपणें एकसाचें ॥
अवतरणें भूवरी होतां त्याचें । भेद होती अनेक ॥ ३० ॥
तें गोदेच्या पात्रांत । तें गोदा म्हणून वाहिलें जात ॥
तें पडे कूपांत । तैसी न त्याची योग्यता ॥ ३१ ॥
संत रूप गोदावरी । तेथील तुम्हीं अहा वारी ॥
आम्हीं थिल्लर कूप सरोवरीं । म्हणून भेद तुम्हां आम्हां ॥ ३२ ॥
आम्हां व्हावया कृतार्थ । आलें पाहिजे तुम्हांमत ॥
म्हणून सर्वदा जोडून हात । कां कीं पवित्रता तुम्हां ठाईं ॥ ३३ ॥
त्यामुळें पवित्रता । आली गोदा जलासी सर्वथा ॥
त्या जलांत पाहतां । तें एकपणें एकची ॥ ३४ ॥
पण गोदावरीचें । जे कां ठरलें पवित्र साचें ॥
करण्यातद भूमीचे । गुणदोष झाले साह्य पहा ॥ ३५ ॥

मेघगर्भींच्या उदकाला । जो भूमी भाग न बदलवी भला ॥
त्याच भूमीच्या भागाला । गोदा म्हणाले शास्त्रवेत्ते ॥ ३६ ॥
इतरत्र जें जल पडलें । त्यानें पात्रगुणा स्वीकारलें ॥
रोगी कडूखारट झालें । मूळचें गोड असूनी ॥ ३७ ॥
तैसें गुरुवरा आहे येथ । षड्रिपूची न घाण जेथ ॥
त्या पवित्र पिंडाप्रत । संत अभिधान शोभतसे ॥ ३८ ॥
म्हणून संत ती गोदावरी । मी म्हणतों साजिरी ॥
अवघ्या जीवात आहे खरी । आपुली श्रेष्ठ योग्यता ॥ ३९ ॥
जगदारंभापासून । गोदा आहेच निर्माण ॥
तोयही भरलें परिपूर्ण । तुटी न झाली आजवरी ॥ ४० ॥
पहा जेव्हां रावणारी । येता झाला गोदातिरीं ॥
त्या वेळचें तेथील वारी । टिके कोठून आजवरी ॥ ४१ ॥
पात्रमात्र तेंच उरलें । जल सागर मिळाले ॥
पावित्र्य कायम राहिले । जल पात्राचें आजवरी ॥ ४२ ॥
प्रत्येक संवत्सरीं । जुनें जाऊनी नवें वारी ॥
येत पात्राभीतरी । तोच न्याय तुम्हां ठाया ॥ ४३ ॥
शतक तेंच संवत्सर ॥ त्या शतकांतील साधूवर ॥
हेंच जल साचार ॥ नाना विभूती ह्या लाटा ॥ ४४ ॥
या संतरूप गोदेसीं । प्रथम संवत्सरासीं ॥
पूर आला निश्चयेसीं । सनत्सनक सनंदनाचा ॥ ४५ ॥
मागून नारद तुंबर । ध्रुव प्रल्हाद बलि नृपवर ॥
शबरी अंगद वायूकुमर । विदूर गोपगोपिका ॥ ४६ ॥
ऐसे बहूत आजवरी । प्रत्येक शतकामाझारीं ॥
पूर आले येवढ्यावरी । ते वर्णाया अशक्यची ॥ ४७ ॥

आमतच्या शतकांत । संतरूप गोडेमत
पण पूर आळांत । साइनाथा निश्चयें ४८ ॥
न तुमच्या दिव्य चरणा । मी करितों वंदना ॥
राज माझ्या दुर्गुणा । पाहूं नका किमपीही ॥ ४९॥
हीन दीन अज्ञानी । पातक्यांचा शिखामणी ॥
अवघ्या कुलक्षणांनीं । परि अव्हेर करूं नका ॥ ५० ॥
अंगींचें दोष । मना न आणी परीस॥
च्या लेंडया ओहोळास । गोदा न लावी परतवूनि ॥ ५१ ॥
मधील अवघी घाण । आपल्या कृपाकटाक्षें करून ॥
करा वेगें हरण । हीच विनंती दासाची ॥ ५२ ॥
परिसाचा संग होऊन । लोहाचें ते लोहपण ॥
न होय गुरुवरा हरण । तरी हीनत्व परिसाशीं ॥ ५३ ॥
ला पापी ठेवूं नका । आपणा हीनत्व घेऊं नका ॥
आपण परीस मी लोह देखा । माझी चाड आपणांते ॥ ५४ ॥
ालक अपराध सदैव करितें । परी न माता रागावते ॥
आणून ध्यानातें कृपा प्रसाद करावा ॥ ५२ ॥
साइनाथा सद्गुरु । तूंच माझा कल्पतरू ॥
पाब्धीचे भव्य तारूं । तूंच असती निश्चयें ॥ ५६ ॥
तूं कामधेनू चिंतामणी । ~~तूं ज्ञान नभींचा वासरमणी~~ ॥
तूं सद्गुणाची भव्य खाणी । अथवा सोपान स्वर्गीचा ॥ ५७ ॥
रे पुण्यवंता परम पावना । हे शांत मूर्ते आनंदघना ॥
रे चित्स्वरूपा परिपूर्णा । हे भेदरहित ज्ञान सिंधो ॥ ५८ ॥
रे विज्ञान मूर्ति नरोत्तमा । हे क्षमाशांतीच्या निवासधामा ॥
रे भक्त जनाच्या विश्रामा । प्रसीद प्रसीद मजप्रती ॥ ५९ ॥

तूंच सद्गुरु मच्छिंदर । तूंच सत्पात्र जालंदर ॥
तूं निवृत्तिनाथ ज्ञानेश्वर । कबीर शेखोनाथ तूं ॥ ६० ॥
तूंच बोधला सांवता । तूं रामदास तत्त्वता ॥
तूंच तुकाराम साइनाथा । तूंच सखा माणिक प्रभू ॥ ६१ ॥
या अपुल्या अवताराची ॥ परी आहे अगम्य साची ॥
ओळख आपुल्या जातीची ॥ होऊं न देतां कवणातें ॥ ६२ ॥
कोणी आपणा म्हणती यवन । कोणी म्हणती ब्राह्मण ॥
ऐसी कृष्णासमान । लीला आपण मांडिली ॥ ६३ ॥
श्रीकृष्णास पाहून । नाना प्रकारें वदले जन ॥
कोणी म्हणाले यदुभूषण । कोणी म्हणाले गुराखी ॥ ६४ ॥
यशोदा म्हणे सुकुमार बाळ । कंस म्हणे हा महाकाळ ॥
उद्धव म्हणे प्रेमळ । अर्जुन म्हणे ज्ञानजेठी ॥ ६५ ॥
तसे गुरुवरा आपणासी । जें ज्याच्या मानसीं ॥
योग्य वाटेल निश्चयेंसी । तें तें तुम्हां तो म्हणतसे ॥ ६६ ॥
मशीद आपलें वसतिस्थान । बिधावाचून आहेत कर्ण ॥
फात्याच्या तऱ्हा पाहून । यवन म्हणणें भाग तुम्हां ॥ ६७ ॥
तैसी अग्नीची उपासना । पाहूनि आपुली दयाघना ॥
निश्चय होतसे आमच्या मना । कीं आपण हिंदु म्हणूनी ॥ ६८ ॥
परी हे भेद व्यवहारिक । यातें चाहतील तार्किक ॥
परी जिज्ञासू भाविक । त्यां न वाटे महत्त्व याचें ॥ ६९ ॥
आपुली आहे ब्रह्मस्थिती । जात गोत ना आपणाप्रती ॥
आपण अवघ्यांचे गुरुमूर्ती । अहां आद्यकारण ॥ ७० ॥
यवन हिंदूंचे विपट आले । म्हणून तदैक्य करण्या भलें ॥
मशीदअग्नीला स्वीकारिलें । लीला भक्तांस दावावया ॥ ७१ ॥

आपण जातगोतातीत । सद्वस्तू जी का सत ॥
तीच तुम्ही साक्षात । तर्कातीत सांचकीं ॥ ७२ ॥
तर्क वितर्कांचें घोडें । चालेल किती आपणांपुढें ॥
तेथें माझें वापुडें । शब्द टिकतील कोठुनी ॥ ७३ ॥
परी पाहुनी तुम्हाला । मौन नये धरितां मला ॥
कां कीं शब्द हेंच स्तुतीला । साहित्य आहेत व्यवहारीं ॥ ७४
म्हणून शब्दें करून । जें जें होईल वर्णन ॥
तें तें सर्वदा करीन । आपुल्या-कृपाप्रसादें ॥ ७५ ॥
संताची योग्यता भली ॥ देवाहून आगळी ॥
अजादुजास नाहीं मुळीं । स्थान जवळ साधुंच्या ॥ ७६ ॥
हिरण्यकश्यपू रावणाला । देवद्वेषें मृत्यु आला ॥
तैसा एकही नाहीं घडला । प्रकार संत द्वस्तानें ॥ ७७ ॥
गोपीचंदें उकीरडयासी । गाडिलें जालंदरासी ॥
परी त्या महात्म्यासी । नाहीं वाटला विषाद ॥ ७८ ॥
उलट राजाचा उद्धार केला । चिरंजीव करूनी सोडिला ॥
ऐशा संतांच्या योग्यतेला । वर्णन करावें कोठवरीं ॥ ७९ ॥
संत सूर्य नारायण । कृपा त्यांची प्रकाशपूर्ण
संत सुखद रोहिणी रमण । कौमुदी ती तत्कृपा ॥ ८० ॥
संत कस्तुरी सोज्वळ । कृपा त्यांची परिमळ ॥
संत इक्षू रसाळ । रस नव्हाळी तत्कृपा ॥ ८१ ॥
संत सुष्टदुष्टांप्रती। समसमान निश्चिती ॥
उलट पाण्यावरी प्रीती । अलोट त्यांची वसतसे ॥ ८२ ॥
गोदावरी जलांत । मळकट तेंच धुवाया येत ॥
निर्मळ तें संदुकींत । राहे लांब गोदे पूनी ॥ ८३ ॥